आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र (दि. १२ जानेवारी २०१८)
विषय : आजच्या संदर्भात वैचारिक साहित्याची प्रस्तुतता

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x<br>Impact Factor 3.025 |
| --- | --- | --- |

# दलित साहित्याचे वैचारिक अधिष्ठान आणि समकालीन अपरिहार्यता

डॉ. स्वप्निल बुचडे

१

माणूस हा समाजशील आणि विचारशील असा प्राणी आहे तो आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांची सतत नोंद घेत असतो. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आणि वैचारिक जडणघडणीत काही सर्जनशील स्वरूपाची मांडणी करण्याची त्याची भूमिका असते ही भूमिका किंवा विचार प्रकट करण्याची त्याची बौद्धिक क्षमता फार महत्त्वाची आहे. आपल्या विचारांच्या केंद्रस्थानी नेहमी माणूस असणे अपेक्षित असते जेणेकरून माणसाला माणसाचा विचार माणूस म्हणून करता येईल भारतीय दर्शनांचा किंबहुना धर्मसंस्कृतीचा विचार करता इथल्या प्रदीर्घ अशा व्यवस्थेच्या चिंतनासाठी आपणनेहमी प्ररित होत असतो. माणूस हा सतत समाज, संस्कृतीच्या संदर्भात आपला आचार विचारांची अभिव्यक्ती करीत असतो समाजव्यवहाराला वजा करून तो आपले कृत्य करत नाही. पण जेव्हा त्याचे माणूसपण नाकारले जाते तेव्हा मात्र तो त्याविरुद्ध बंड करून उठतो बोलू लागतो आपल्या संदर्भात घडणाऱ्या घटना इतरांना सांगू पाहतो हे त्याचे सांगणे स्वतःच्या अस्तित्त्वासाठी असते. मला माझे अस्तित्त्व पुन्हा मिळावे यासाठी असते. असाच विद्रोहातून जन्माला आलेला साठोत्तरी साहित्य प्रवाह म्हणजे दलित साहित्य होय. दलित साहित्याला विचारांची एक बैठक लाभली. या साहित्याला ज्या विचारांचे अधिष्ठान लाभले ते म्हणजे गौतम बुद्ध म. जोतीराव फुले. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे होय दलित साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह हा प्रस्थापित व्यवस्थेच्या जोखडाखाली बांधल्या गेलेल्या वर्गाचा आहे. प्रस्तुत चर्चासत्राचा विषय 'आजच्या संदर्भात वैचारिक साहित्याची प्रस्तुतता' असा असल्याने दलित साहित्याला लाभलेला विचार आणि आजच्या संदर्भात त्या विचाराने उभा केलेला संघर्ष यासंदर्भात मांडणी करणे या शोधनिबंधाच्या निमित्ताने अपेक्षित आहे

२

वैचारिक साहित्यात विचार, विचारवंत, विचारसरणी, वैचारिकता इत्यादी घटकांविषयी मूलभूत चिंतन केलेले असते विचार म्हणजे काय तर, *i) कल्पनाशक्ती बुद्धी यांचा वापर अभ्यासपूर्ण चिंतन खलबत, चर्चा, तारतम्य, विवेक, तर्क, मनन ii) विवेक, चिंतन, मनन करून केलेला निश्चय, निर्णय, निकाल, मत iii) विचार हा शब्द इंग्रजीतील Thought चा पर्याय म्हणून येतो.* (दाते य. रा. , महाराष्ट्र शब्दकोश) मुळातच विचार हा मानवी जीवनाला उर्जा देणारा घटक असल्याने मानवी विकास हा विचारवंतावर अवलंबून असू शकतो असे म्हणता येतेयाच्याही पुढे जावून विचार करणारा तो विचारवंत अशी ढोबळव्याख्या जर आपण केली तर प्रत्येक व्यक्ती विचार करते म्हटल्यावर ती विचारवंत असत नाही तर विचारवंत म्हणजे, *जो आपल्या बुद्धीचा अर्थात विचारशक्तीचा सृजनात्मक उपयोग करतो तो म्हणजे विचारवंत होय* ( वाघमारे जनार्दन : १९९५ : ४७ ) असे म्हणता येईल. इंग्रजीत विचारवंतया शब्दाला Thinkar असा शब्द योजला जातो. विचारवंत विशिष्ठ अशा विचारांच्या बैठकीवर आपल्या भूमिकांची मांडणी करीत असतो त्याच्या या भूमिकेमागे विशिष्ठ अशी तात्त्विक बैठक जरूर असते. त्या तात्त्विकतेला किंवा विचारांच्या बैठकीलाच विचारप्रणाली, विचारसरणी अशा पद्धतीचा अर्थ प्राप्त होताना दिसतो. विचारवंताच्या चिंतनाचा भाग 'विचार' हा असतो आणि विचारसरणी ही विचारवंताच्या विचारांचा परिपाक असते विचार करणे, विचार मांडणे, त्याचे खंडन करणे व नवीन विचारांची मांडणी करणे ही मानवी समाजात अव्याहत चालणारी प्रक्रिया आहे यातूनच विचारभेद होवून अनेक विचारधारांचा जन्म झाला. कोणत्यातरी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व्यवस्थेला विरोध करण्यातून विचारसरणीचा उदय झाला असेही म्हणता येईल. यावरून एक गृहीतक सांगता येते की, व्यवस्थेचे समर्थन किंवा विरोध हा विचारसरणीचा पाया आहे.

विचार, विचारवंत, विचारसरणी आणि या श्रृंखलेतील शेवटचा घटक म्हणजे वैचारिकता हा होय. वैचारिकता ही मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या विचारवंताच्या संदर्भात विकसित झालेली अवस्था असते समाज, संस्कृती आणि व्यवहारातील व्यापक अशा निरीक्षणातून आणि चिंतनातून विचारवंताची वैचारिक घडण होत असते विचारवंताच्या वैचारिकतेसंदर्भात आणि त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि ऐतिहासिक चिंतनासंदर्भात बोलताना डॉ गंगाधर पानतावणे यांनी भूमिका व्यक्त केली त्यानुसार, *जग बदलण्याची, शोषकांच्या धारणांनी उलथून टाकण्याची प्रतिज्ञा वैचारिकतेत असते. वैचारिकतेला समाजव्यवस्थेतील विसंगतीचा, अनुदारतेचा, अंतर्विरोधांचा आणि स्थितीशिलतेचा सतत शोध घ्यावा लागतो समाजपरिवर्तनाचा ध्यास घेणारी वैचारिकता इतिहासाचा अन्वय लावते, वर्तमानाची चिकित्सा करते आणि भविष्याचा कानोसा घेते. यातूनच नवसमाजरचनेला आरंभ होतो विचार हे लिप्त असतात, अलिप्त नसतात. म्हणूनच वैचारिकता ही सामाजिक,*

*राजकीय आणि ऐतिहासिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेत गतिमान होण्याची गरज असते. वैज्ञानिकता अंधश्रद्धा आणि लोकभ्रम निरस्त करून मानवी संस्कृतीला नवे अधिष्ठान येते. शोषणाचे आणि दास्यवृत्तीचे बुरुज ढासळून टाकण्याची अंतशक्ती या विज्ञाननिष्ठ वैचारिकतेत असते.* (जाधव मनोहर संपा. : २००० : १२०-१२१) असे म्हटले आहे यावरून आपल्याला वैचारिकतेसंदर्भातील साधारण भूमिका स्पष्ट करता येईल. वैचारिकता ही इतिहास, वर्तमान आणि भविष्य माणसाला विचार करायला भाग पाडते. वैचारिकता ही नवसमाजरचनेला आरंभ करते. आणि या वैचारिकतेला वैज्ञानिकतेची, मानवतावादाची जोड असेल तर अंधश्रद्धा व लोकभ्रम बाजूला पडून मानव्याच्या संस्कृतीला नवा आकार येतो वैचारिक साहित्यासंबंधी काही मान्यवर अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्यांचा विचार करून दलित साहित्याला लाभलेल्या वैचारिक प्रेरणांचा आढावा घेता येईल. ज्या प्रेरणा मानवतावादाची मांडणी करतात. माणसाला माणूस म्हणून स्थान मिळावे यासाठी प्रयत्न करतात

वैचारिक वाङ्मय म्हणजे काय या प्रश्नाचा मागोवा घेत असताना ह. श्री. शेणोलीकर यांनी *व्यक्ती व समाज यांच्यातील सांस्कृतिक अंगांचा विचार विचारांच्या पातळीवर ज्या साहित्यामध्ये केला असेल ते म्हणजे वैचारिक साहित्य होय.* (कुलकर्णी गो.म. व कुलकर्णी व. दि. संपा. : १९८८ : १०६) अशी मांडणी केली. त्याचबरोबर यशवंत मनोहर यांनी, *विचारप्रकटीकरण, विचारमंथन, आणि विचारसमर्थन यांना ज्या साहित्यात महत्वाचे स्थान असते. अशा साहित्याला वैचारिक साहित्य असे म्हणावे* याप्रकारची भूमिका मांडली(मनोहर यशवंत : १९८८ : ४५) वैचारिक साहित्यासंदर्भात डॉ. नीलकंठ शेरे म्हणतात की, *ललित आणि वैचारिक साहित्यात पूर्णतः भेद नसतो. वैचारिक साहित्यातील वस्तुनिष्ठता वैचारिकता, वर्णनात्मकता ललित वाङ्मयात प्रत्ययास येते. परंतु तो भावनेवर आरूढ होवून अवतरतो वैचारिक साहित्याची निर्मिती, रचना ही तर्कानुमानाधिष्टीत असते. ती बुद्धिनिष्ठ तर्कशुद्धतेवर झुकलेली असते* (शेरे नीलकंठ : २००५ : २०) अशी मांडणी डॉ. शेरे यांनी केली. या व्याख्यांच्या माध्यमातून वैचारिक साहित्याविषयी एक मांडणी आपल्या लक्षात येईल. मुळातच वैचारिक साहित्य हे विचारवंताच्या वैचारिक बैठकीवर उभे असते. ही विचारांची बैठक त्याच्या चिंतनातून बनलेली असते ललित आणि वैचारिक साहित्य यामध्ये लिहिणारा लेखक हा विशिष्ट्य अशा वैचारिक व्यवहारात त्याची मांडणीची बैठक निश्चित करत असतो. त्यादृष्टीने मांडली जाणारा विचार त्याच्या वैचारिक भूमिकेतून साकार होत असतो यासंदर्भात डॉ. सारीपुत्र तुपेरे त्यांच्या*वैचारिक साहित्याची स्वरूपतत्त्वे* या ग्रंथात म्हणतात की, *विचारवंत हा वैचारिक साहित्याचा निर्माता असतो. तो बुद्धिनिष्ठ, वैज्ञानिक, तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ पद्धतीने विचारांची मांडणी करून विचारमंडन, विचारखंडन व नवमतप्रतिपादन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून वैचारिक साहित्य निर्मिती करतो त्यामुळे वैचारिक साहित्यात विचार, विचारवंत, वैचारिकता, सामाजिक परिप्रेक्ष, वस्तुनिष्ठ तर्कसंगत भाषा इ घटक महत्त्वाचे आहेत.* (तुपेरे डॉ. सारीपुत्र : २०१२ : २७-२८ ) या विचारवंतांनी मांडलेल्या मतांना एका विशिष्ट तत्वज्ञानाच्या चौकटीत तपासले असता त्याला लाभलेली प्रेरणा हीसुद्धा महत्वाची असते. अशीच वैचारिक पार्श्वभूमी दलित साहित्याला लाभली. साठोत्तरी कालखंडात उदयाला आलेल्या दलित साहित्याला लाभलेली वैचारिक पार्श्वभूमी म्हणून गौतम बुद्ध, म. जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक प्रेरणेच्या लाभलेल्या अधिष्ठानाचा विचार मांडता येईल.

www.aiirjournal.com

३

दलित साहित्याचा उदय हा प्राप्त परिस्थितीत दबल्या गेलेल्या संवेदनशील मनाचा हुंकार आहे सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिस्थितीचा संदर्भही यासाठी कारणीभूत आहे हिंदू संस्कृतीने जातीव्यवस्थेची चाकोरी निर्माण केली त्यामुळे दलित अवस्थेत जगणाऱ्यांचा वेळोवेळी बळी जात राहिला. पण कालौघात या परिस्थितीला विरोध केला पाहिजे या विचारांची समाजमने तयार झाली. अशा समाजमनाच्या तत्त्वज्ञानातून, क्रांतिकारी विचारातून समाजपरिवर्तनाचा मार्ग सापडत गेला अशा तत्त्वज्ञानाचे आणि क्रांतीचे मार्ग दाखवणारे विचारवंत हे दलित साहित्याचे प्रेरणास्थान ठरले यामध्ये भगवान बुद्ध, महात्मा जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्त्वाचे आहे अर्थात दलित साहित्याची प्रेरणा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली येवला येथील परिषदेत एक ऐतिहासिक घोषणा केली की, " मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' आणि त्यानंतर १९५६ साली त्यांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केला. पण दरम्यानच्या साधारणतः २१ वर्षांच्या कालखंडात त्यांनी वेगवेगळया धर्मांची चिकित्सा केली त्यानंतर बौद्ध धम्माचा स्वीकार केला. बुद्धाच्या धम्म विचारातील मानवतावादी दृष्टीचा स्वीकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला तसेच या मानवतावादी मूल्यांचा समावेश त्यांनी भारतीय संविधानात केला स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांची उभारणी संविधानात करत असताना बाबासाहेबांच्या समोर फ्रेंच राज्यक्रांतीचा आदर्श जरूर होता पण त्यांनी ही तत्त्वत्रयी बुद्धाच्या

विचारातून घेतली. म्हणून विश्व मानव्याचा विचार मांडणाऱ्या बुद्धाने प्रज्ञा शील, करुणेच्या रूपाने माणसाचा जो विचार केला त्या वैचारिकतेची प्रेरणा दलित साहित्याला लाभली. त्याचबरोबर महात्मा फुले, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही विचार प्रेरणा देणारा ठरला. त्याचा विचार पुढील प्रमाणे करता येईल

**भगवान बुद्ध: -**

सत्याच्या शोधासाठी राजपुत्र सिद्धार्थ गौतम बुद्ध एका पिंपळ वृक्षाखाली समाधी लावून बसले असता त्यांना जगातील दुःखाचा उलघडा झाला त्यामुळे त्यांना बुद्ध म्हणजे ज्ञानी मानले जाते. दुःख हे सर्व गोष्टींच्या मुळाशी असते बौद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भात विवेचन करत असताना श्रीधर वर्णेकर म्हणतात की, *जग हे दुःखमय आहे म्हणून या दुःखापासून आपली सुटका करून घेतली पाहिजे असा बौद्ध धर्माचा संदेश आहे जगातल्या दुःखाचा विलय करणे हाच आपल्या जीविताचा उद्देश आहे. असे भगवान बुद्धाने आपल्या शिष्यांना वारंवार सांगितले आहे क्षणिकता किंवा क्षणभंगुरता हे या सर्व दुःखाचे मुळ कारण आहे. त्याचे ज्ञान झाले म्हणजे सर्व प्रकारच्या परिस्थितीत मनुष्य शांततेने व समाधानाने राहू शकतो असे बौद्ध धर्म सांगतो.* (वर्णेकर श्रीधर : १९७५ : १८२-१८३) वर्णेकर यांनी दुःखाच्या कारणांची मीमांसा केलीत्यांनी क्षणिकता किंवा क्षणभंगुरता हे सर्व दुःखाचे मुळ कारण आहे अशी मांडणी केलीमुळात बौद्ध दर्शनाचा पाया दुःखापासून सुरु होतो आणि त्याच्या निवारणार्थ त्यांनी अनेक तत्त्वांची मांडणी केली दुःखाच्या निवारणार्थ बुद्धाने प्रतिपादलेल्या चार आर्यसत्यांचे, प्रतीत्यसमुत्पादाचे आकलन करून घेऊन शील, समाधी, व प्रज्ञा ह्या पायऱ्यांनी गेल्यास साधकास दुःखापासून मुक्त होण्याचे ध्येय गाठता येते अशी श्रद्धा आहे या दुःखाच्या निवारणासाठी आर्यसत्ये सांगितली ती पुढीलप्रमाणे, बुद्धाने आपल्या पहिल्या प्रवचनात चार आर्यसत्याचा उपदेश केला. दुःख दुःखकारण दुःखाचा निरोध आणि दुःख निरोधाचा मार्ग ही ती आर्यसत्ये होत याचे स्पष्टीकरण श्रीनिवास दिक्षित यांनी पुढीलप्रमाणे केले *I. **दुःख** जगात दुःख आहे आणि ते भरपूर आहे एवढेच बुद्धाला सांगावयाचे होते काय? तसे असले तर त्याला आर्यसत्ये का म्हणायचे ? दुःख ही एक महान वस्तू आहे, गंभीर गोष्ट आहे त्याची कदर केली पाहिजे. हे सुचविण्यासाठी दुःखाला आर्यसत्य म्हंटले असावे. II. **दुःखकारण** पण लगेच त्याने असेही सांगून टाकले की दुःखास कारण आहे दुःख आकस्मित नाही. दुःखाचे मूळ कारण अविद्या होय. अविद्येतून तृष्णा आणि तृष्णेमुळे दुःख उत्पन्न होते. III. **दुःखनिरोध :** दुःखास ज्या अर्थी कारण आहे. त्या अर्थी त्या कारणाचा निरोध केल्यास दुःखाचा संपूर्ण उपशम होऊ शकतोअसे उमगणे म्हणजे तिसऱ्या आर्यसत्याचे ज्ञान होय. IV. **मार्ग :** (दुःख निरोधागामिनी प्रतिपदा) केवळ दुःखनिरोध शक्य आहे इतकेच नव्हे, तर त्यासाठी एक निश्चित मार्ग आहे अष्टांग मार्ग हे त्याचे नाव* (दीक्षित श्रीनिवास : १९९६ : १३२) या पद्धतीने श्रीनिवास दिक्षित यांनी आर्यसत्यांचे वर्णन केले. या आर्यसत्यांमध्ये दुःखनिवृत्तीचा जो मार्ग सांगितला आहे तो दुःखातून मुक्त होईल असा मार्ग सांगितला आहे तो अष्टांगिक मार्ग होय. या अष्टांग मार्गावरून गेल्यास आपले जीवन दुःखातून मुक्त होईल असे बुद्धाने सांगितलेया अष्टांगिक मार्गात १.सम्यक् दृष्टी – यथार्थज्ञान, २. सम्यक् संकल्प - योग्य गोष्टी करण्याविषयी मनाचा निश्चय, ३. सम्यक् वाक् - योग्य शब्दांची योजना, ४. सम्यक् कर्मान्त - योग्य कृत्ये, ५. सम्यक् आजीव - उदरनिर्वाहाचा योग्य उद्योग, ६. सम्यक् व्यायाम - योग्य प्रकारचे प्रयत्न, ७. सम्यक् स्मृती - योग्य प्रकारचे विचार, ८.सम्यक् समाधी - योग्य प्रकारची मनाची शांतीयुक्त स्थिती ह्या घटकांचा समावेश होतो. याठिकाणी प्रत्येक वेळी येणाऱ्या सम्यक चा अर्थ शुभ (चांगले) असा आहे. या आर्य अष्टांगिक मार्गाच्या योग्य पालनाने कामक्रोधादिक सारे विकार शांत होऊन दुःख व शोक नाहीसे होतात. त्यायोगे मानव आपल्या जीविताचे अंतिम ध्येय जे निर्वाण तो प्राप्त करू शकतो. या अष्टांग मार्गालाच मध्यम मार्ग (कोणताही अतिरेक न करता दोन्ही टोकांचा समन्वय साधने) असेही म्हंटले आहे

भगवान बुद्धांचे कार्य मानवतेसाठी अनमोल आहे त्यांच्या कार्याविषयी बाबुराव बागूल म्हणतात *ज्या महापुरुषाने कधी स्वर्ग मानला नाही, जातीभेद जाणला नाही, कर्मकांडाला जुमानले नाही, यज्ञयागाला गौरवले नाही, पशुवधाला पाठिंबा दिला नाही, मूर्तीपूजन उचलून दिले नाही, स्वामी बाबा या दलालांना कधी उचलून धरले नाही देव्हाऱ्यात कधी पाऊल टाकले नाही. तरीही गौतम बुद्ध विश्ववंद्य ठरले आहेत* (बाबुराव बागूल: १९७५ : २-३) असे महान विचार असणाऱ्या भगवान बुद्धाला दलितांनी आपल्या साहित्यातील सर्वकालीन प्रेरणा मानले. मानवतावादी विचारसरणीच्या या महान तत्त्ववेत्याने शोषित समाजाला सर्वप्रथम जागे करण्याचे काम केले. मानवत्वाची वाट दाखवली. त्याचे जीवन कर्तृत्व दलित साहित्याची प्रेरणा असणे साहजिक आहे. गौतम बुद्धाने अज्ञान, अंधश्रद्धा याला विरोध करताना हिंदू धर्मातील कर्मठपणाला विरोध केला शोषण करणाऱ्या, अस्पृश्यता मानणाऱ्या जातीव्यवस्थेला ते नाकारतात. अर्थातच बुद्धाचे तत्त्वज्ञान नीतिमत्ता, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यावरती आधारलेले आहे.

**महात्मा फुले : -**

'महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर' म्हणून महात्मा जोतीबा फुले यांना ओळखले जाते अस्पृश्यांच्या उद्धारासाठी, बहुजनांच्या हितासाठी, स्त्री शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे महात्मा फुले हे दलित साहित्याचे महत्त्वाचे प्रेरणास्थान आहेत महात्मा फुलेंनी विद्येचे महत्त्व पटवून देताना म्हंटले की विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले असे विचार मांडून अस्पृश्य आणि स्त्री शिक्षणासाठी फार मोठे क्रांतिकारी कार्य केले. धर्मरूढी, परंपरेच्या जाचक अटी, अन्यायातून शूद्रांना मुक्त करण्याचे जीवनध्येय त्यांनी बाळगले. मानवाच्या उत्थानासाठी म. फुले यांनी प्रयत्न केले. दलित समाजाला, पिडीत समाजाला लढण्यासाठी आणि न्याय मिळवून देण्यासाठी म. फुले आयुष्यभर झगडत राहिले. जातीयता संपवण्यासाठी, कर्मठ परंपरा मानणाऱ्या शक्तींच्या विरोधात लढण्यासाठी त्यांनी ताकद देण्याचे काम केले म्हणूनच म. फुले यांचे जीवन कर्तृत्वहीदलित साहित्याचे प्रेरणास्थान आहे.

सामाजिक व धार्मिक सुधारणांना देशात अनुकूल वातावरण निर्माण होण्यासाठी त्यांनी पाश्चात्य शिक्षणाचा आणि ज्ञानाचा पुरस्कार केला. म. फुले यांना समाजातील विषमतेमुळे खूप दु:ख झालेत्यांनी समाजाला शिक्षण, स्त्रियांना सन्मान, आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. त्याचाच भाग म्हणून त्यांनी सन १८४८ साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सन १८५२ मध्ये गावकुसाबाहेरच्या मुलांसाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाळा सुरु केलीअस्पृशांसाठी स्वतःच्या घरचा पिण्याच्या पाण्याचा हौद खुला करून दिला. आपल्या मतांचा आणि विचारांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी खेड्यापाड्यात जावून खरा धर्म, खरी माणुसकी यांचे शिक्षण लोकांना देण्याचा प्रयत्न केला यासाठी सन १८७३ मध्ये म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील प्रश्न जाणून त्यादृष्टीने माणसाला माणूसपणाची वागणूक देणारे विचार पेरण्यास सुरवात केली ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सहवासामुळे सेवा, समानता, स्वार्थत्याग, परोपकार, मानवता ह्या गुणांचा स्वीकार त्यांनी केला आपल्या समाजातील जातीयता, विषमता, अज्ञान, अनिष्ट चालीरीती, दारिद्र्य, स्त्रियांचे दैन्य या गोष्टींमुळे ते अस्वस्थ झाले आणि त्यांनी समाजात मानवता रुजवण्याचा प्रयत्न केला. ज्यातून नव्या वैचारिकतेची ज्यात विश्व मानव्याच्या रुजवण्याची बीज पेरली गेली. म्हणून म. फुले हे दलित साहित्याची प्रेरणा ठरतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर : -**

महात्मा फुले यांच्यानंतर दलित समाजाची दुखे दूर करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने महानायक जन्माला आला. विचारानुसार आचरण करणाऱ्या बाबासाहेबांनी आयुष्यभर दलितांच्या उद्धाराचा विचार केला. त्यासाठी अखंड प्रयत्न केले व त्यात यशस्वी झाले. परिणामतः दलित समाजात मोठी क्रांती झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे 'नव जीवनाविष्कार', विद्रोह, व संघर्षाने भरलेले प्रेरणादायी जीवन. दलित जीवनात क्रांतिसूर्य बनून डॉ बाबासाहेब आंबेडकर आले गावकुसाबाहेरील अंधाराला आपल्या तेजाने प्रकाशमान करणारा तेजस्वी सूर्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. जुलमी कर्मठ रूढी परंपरेच्या विरोधात बाबासाहेबांनी सतत लढा दिला अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी दलित समाजाला उद्युक्त केले दलित समाजाला संघर्षासाठी सज्ज करताना ते म्हणतात, *जे झगडतात, त्यांनाच यश येते. नैराश्याचे युग आता संपले आहे नवीन युगास आता प्रारंभ झाला आहे तुमचा उद्धार करावयास कुणीही येणार नाही. मनात आणले तर तुमचा उद्धार करण्यास तुम्हीच समर्थ व्हाल* (पानतावणे गंगाधर : १९७६ : २०) असा विचार दलित समाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बिंबवला. त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून दलित समाजाची अस्मिता जागृत केली त्यांच्यामध्ये आत्मसन्मानाने जगण्यासाठी शक्ती निर्माण केली. मानवतेच्या मूल्यासाठी, मूलभूत हक्कासाठी लढा देण्याचे बळ दिले आत्मसन्मानासाठी स्वतःला झगडावे लागणार आहे याची जाणीव करून दिली. यातून दलित मने जागृत झाली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथातून आलेले विचार हे दलित साहित्याला प्रेरणा देणारे ठरले माणसाच्या मुक्तीचे, जीवनाचे, मानवत्वाचे महान तत्त्व आपल्या '*Budhh and his dhamma*' या ग्रंथातून ते मांडतात संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा विचार करणारे तत्त्व हे बुद्ध विचाराचे आहे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ओळखले व त्यांच्या विचाराचा स्वीकारही केला. कारण बुद्ध विचार संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा विचार करणारा आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण आयुष्य त्यांची विचार प्रणाली आणि त्यांचे महान व्यक्तिमत्त्व यातून दलितांना आपल्या मुक्तीचा यशस्वी मार्ग सापडला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्या प्रतिकूल परिस्थितीचे दाहक अनुभव सहन करावे लागले, त्यातूनच त्यांनी या परिस्थितीविरुद्ध लढण्याचे ठरविले, आपला संघर्षाचा मार्ग निवडला. यातूनच 'दलित - मुक्ती' हेच त्यांचे जीवन ध्येय बनले

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x<br>Impact Factor 3.025 |
| --- | --- | --- |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्मठ रूढी परंपरांच्या विरोधात संघर्ष केला तोच मुळी मानवतावादाच्या दृष्टीकोनातून. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैर हे शोषण प्रवृत्तीशी अस्पृश्यतेशी, जातीयवादाशी होते. अहिंसेचा पुरस्कार करणारे, नवनिर्मितीसाठी कार्य करत राहणारे ते एक महान व्यक्तिमत्व होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याची प्रत्यक्ष प्रेरणा ठरले. त्यांचा जीवन प्रवास, स्वीकारलेली मानवी मूल्ये, स्वीकारलेले तत्त्वज्ञान यामुळे दलित जीवनात क्रांतिकारी बदल घडून आला. सम्यक क्रांतीचा विचार करणारे दलित साहित्य शेवटी मानवाच्या प्रतिष्ठापनेसाठी अवतरते. याचा मूल्यात्म विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून होतो म्हणूनच दलित साहित्याची आशयभूत प्रत्यक्ष प्रेरणा आंबेडकरवाद हीच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने मराठी भाषिक क्षेत्रात स्वातंत्र्योत्तर कालखंडात दलित साहित्याचा प्रवाह सुरु झाला. या प्रवाहामध्ये मराठीतील दलित कादंबरीने महत्त्वपूर्ण योगदान नोंदविले युगानुयुगे पारंपरिक व्यवस्थेच्या बंधनाखाली दलित समाज पिचला गेला होता, गुलामगिरीत, जोखडात अडकला होता, ही बंधने दलित जीवन वेदनामय करण्यास कारणीभूत ठरली. सर्वच क्षेत्रात त्यांच्यावर बंधने घातल्याने दलित समाज मूक बनला त्यांच्या वाट्याला गावकुसाबाहेरचे अपमानित जीवन आले. अज्ञानात राहिलेल्या या समाजावर प्रस्थापित व्यवस्थेने अनन्वित छळ केले. या अन्यायाचा हुंकार म्हणजेच दलित साहित्य प्रवाहाची निर्मिती होय.

४

दलित संकल्पनेची व्याख्याच मुळात *जे प्रस्थापितांच्या विरोधात उभे राहून दलित समाजाच्या बाजूने लढले त्यांनी आयुष्यभर दलित मुक्तिसाठी संघर्ष केला. जे अवमानित होते, ते सन्मानित व्हावेत त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी हाच त्यामागे हेतू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा होता तोच हेतू घेऊन दलित साहित्य जन्माला आले आहे* (मेश्राम योगेंद्र : १९९८ : ५१) अशी भूमिका योगेंद्र मेश्राम यांनी मांडली तसेच दलित साहित्य म्हणजे, *जो - जो या समाजरचनेविरुद्ध आणि सांस्कृतिक व्यूहाविरुद्ध लढणारा दृष्टीकोन घेवून साहित्य निर्मिती करील आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणेल तो-तो दलित साहित्यिक असेल. आणि साहित्य हे दलितांच्या दृष्टीकोनातून लिहिलेले असेल* (मेश्राम योगेंद्र : १९९८ : ६२) म्हणजे विश्व मानव्याचा स्वीकार करून दलित साहित्याची निर्मित झाली. ज्या साहित्याला गौतम बुद्ध, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा लाभली.

या सर्व मांडणीचा विचार करता दलित साहित्याला लाभलेल्या या विचारांची किंवा प्रेरणाची समकालीन अपरिहार्यता काय ? हा प्रश्न पडल्यावाचून राहात नाही. भारतीय पातळीवर विचार करता संविधानाने धर्म, वंश, जात, लिंग आणि जन्मस्थान यावरून कोणत्याही व्यक्तीत मतभेद केला जाणार नाही अशी भूमिका अनुच्छेद १४ अनुसार मांडली पण समकालीन समाजजीवन यानुसार मार्गक्रमण करताना दिसत नाही. त्याशिवाय *'न्यायाची ऐशी तैशी'* या शीर्षकाचा निबंध लिहून न्याय व्यवस्थेतील फोलपणा प्रज्ञा दया पवार यांना नोंदवावा वाटला नसता. (प्रज्ञा दया पवार : २०१७ : ३९) याच अंकात नितीश नवसागरे यांनी *'नितीन आगेच काय झाल ?'* या शीर्षकाच्या लेखात भारतीय संविधानाच्या स्वीकारानंतरच्या दलित अत्याचाराच्या घटनांची नोंद केली. यात *१९६८ सालची किलवेनमनीमधली घटना, १९७८ सालची विल्लीपुरम, १९९६ बथानिटोला, १९९७ ची लक्ष्मणपूर, १९९१ सुन्दूर, १९९७ रमाबाई आंबेडकर नगरची घटना, २००६ चे खैरलांजी हत्याकांड* (नितीश नवसागरे: २०१७ : ४३ - ४४ ) या घटनांचा विचार करता संविधानाला अभिप्रेत असणारी आणि गौतम बुद्ध, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली वैचारिक भूमिका यशस्वी झाली का ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे म्हणून नितीश नवसागरे याच लेखात एक प्रश्न उपस्थित करतात की, *ज्यांची या राज्यघटनेवरती व न्याय व्यवस्थेवरती संपूर्ण श्रद्धा आहे त्यांनाच ह्या व्यवस्थेत न्यायापासून वंचित ठेवले जात आहे आपण राजकीय लोकशाही अजून प्रस्थापित करणे ही आपल्या मुख्य जबाबदाऱ्यांपैकी एक आहे, असे अजूनही राज्यकर्त्यांना वाटत नाही एक व्यक्ती एक मत हे तर आपण प्रस्थापित करू शकलो परंतु प्रत्येक व्यक्तीचंमूल्य एक आहे, समान आहे हे अजून आपण प्रस्थापित करू शकलो नाही.* (नितीश नवसागरे: २०१७ : ४४) आणि याच प्रश्नात आपण दलित साहित्याला आणि स्वाभाविकच भारतीय संविधानाला लाभलेल्या वैचारिकतेची समकालीन अपरिहार्यता आणि गरज विचारात घेवू शकतो. जो विचार कोणत्याही प्रकारचा मतभेद न पाळता समानता, बंधुभाव, स्वातंत्र्य आणि न्यायाच्या भावनेने सर्वांप्रती आदर, प्रेम व्यक्त करू बघतो आहे. समकाळात या विचारांची अपरिहार्यता आहे असे यानिमित्ताने नमूद करणे मला गरजेचे वाटते

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x<br>Impact Factor 3.025 |
|---|---|---|

संदर्भ :

१) कांता अभय संपा : २०१७ : परिवर्तनाचा वाटसरू, (प्रज्ञा दया पवार, नितीश नवसागरे यांचे लेख), १६ ते ३१ डिसेंबर २०१७ चा अंक.
२) कुलकर्णी गो.म. व कुलकर्णी व. दि. (संपा.) : १९८८ : मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ६, भाग १, मधील ह. श्री. शेणोलीकर यांचा लेख – वैचारिक वाङ्मय, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्र. आ.
३) जाधव मनोहर (संपा.) : २००० : *साहित्य शोध आणि संवाद* (डॉ. गंगाधर पानतावणे यांची अध्यक्षीय भाषणे), सुविद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ.
४) तुपेरे डॉ. सारीपुत्र : २०१२ : *वैचारिक साहित्याची स्वरूपतत्त्वे, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, प्र. आ.*
५) दाते य. रा. , महाराष्ट्र शब्दकोश
६) दीक्षित श्रीनिवास : १९९६ : भारतीय तत्त्वज्ञान, फडके पब्लिशिंग, कोल्हापूर, ६वी आवृत्ती.
७) पानतावणे गंगाधर, १९७६ : *विद्रोहाचे पाणी पेटले आहे*, विजय प्रकाशन, नागपूर.
८) बागूल बाबुराव, १९७५ : *साप्ताहिक सिंहगर्जना* (यवतमाळ), दिवाळी आणिक.
९) मेश्राम योगेंद्र : १९९८ : *दलित साहित्य उद्गम आणि विकास*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र.आ.
१०) वर्णेकर श्रीधर :१९७५ : *भारतीय धर्म तत्त्वज्ञान*, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे, प्र. आ.
११) वाघमारे जनार्दन : १९९५ : *समाजपरिवर्तनाच्या दिशा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ.
१२) शेरे डॉ. नीलकंठ : २००५ : डॉ. आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङ्मय, सुविद्या प्रकाशन, पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com